# ज्ञानसूर्य



BVBK-0402902

ग्रं० वि०
२९०२
१८/१२/९४

दा. क्र. २९०२ दिनांक १८/१२/९४
विषय ७११.९१

# ज्ञानसूर्य

लेखक : रुपाग्रज

किंमत १२ रुपये

BVBK-0402902

सोनाली प्रकाशन
८६ नारायण पेठ, पुणे ३०.

बाल कथासंग्रह

लेखक

रूपाग्रज :

प्रकाशक :

द.ग. आदवडे

सोनाली प्रकाशन

८६ नारायण पेठ,

सावंत वाडा, पुणे

© रूपाग्रज. तानाजी नगर, ३७ / १६

धनकवडी, पुणे ४११ ०४३.

प्रथमावृत्ती :

सप्टेंबर १९९३

मुखपृष्ठ व सजावट :

रजनी फणसळकर

मुद्रक

प्रमोद वि. बापट

स्मिता प्रिंटर्स,

१०१९ सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३०

अक्षरजुळणी

यशोदीप टाईपसेटींग

५९० शनिवार पेठ, पुणे ३०.

# प्रस्तावना

दु:खाच्या ओंजळभर पाण्याबरोबर सुखाचे घोटभर पाणी पिण्याची संधी माणसांच्या आयुष्यात नक्कीच येते. याला 'रुपाग्रज' ही अपवाद नाहीत.

प्रचंड कालावधीच्या खडतर परिश्रमानंतर त्यांचा हा 'ज्ञानसूर्य' प्रकाशित होतोय... खरोखरीच मन सुखावते. 'रुपाग्रज' यांचा 'ज्ञानसूर्य' हा सात कथांचा संग्रह म्हणजे सप्तरंगाचे एक प्रतीकच होय, त्यांनी प्रत्येक कथेत त्यांच्या आगळ्या वेगळ्या शैलीने रंग भरला आहे.

मुलांसाठी लिहिलेला त्यांचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. त्यांचा हा प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहे. प्रत्येक कथेत त्यांनी वेगवेगळे विषय हाताळले आहेत. मुलांना बचतीची सवय लागावी म्हणून 'पाच पैशाची किंमत'' या कथेत सोनुने जमविलेले पाच-पाच पैसे आईच्या आजारपणात उपयोगी कसे पडतात? असे बचत, आरोग्य, गरिबी, साहस, आळस याबरोबरच वृक्ष, प्राणी, पक्षी यांची मैत्री असे विषय त्यांनी हाताळले आहेत. त्यांची प्रत्येक कथा मुलांना प्रेरणादायी ठरेल व प्रत्येक बालक कथा वाचून अष्टपैलु बनेल; यात शंकाच नाही.

'रुपाग्रज' फक्त छोट्या दोस्तांसाठीच ज्ञानाची शिदोरी देत नाहीत तर ते प्रौढांसाठीही, समाजप्रबोधनपर कथा, कादंबऱ्या लिहीतात. ते भावी काळात स्वत:च्या अगळ्या-वेगळ्या शैलीने लेखन करून साहित्यीकात स्वताचे एक वेगळे स्थान निर्माण करतील. अशी आशा बाळगून त्यांना सुयश चिंतीतो!

- सूर्यकांत तावडे

[संचालक, चॉकलेट गँग. बालरंगभूमी पुणे]

*माझ्या असंख्य*
*निरागस व निष्पाप*
*चिमुकल्या मित्रांना,*
*आणि*
*प्रिय आई-वडीलास*

– रूपाग्रज.

# अनुक्रमाणिका


१. 'पाच पैशाची किंमत'

२. 'लेमन गोळी, दाताची होळी'

३. 'शिळ्या भाकरीला, पोळीची चव'

४. आम्हीच वैरी 'वृक्षांचे'

५. 'गरीब बिचा-या चिमणीला...'

६. 'होता अप्पू म्हणून वाचला पप्पू'

७. 'क्षणाचा आळस, अपयशाचा कळस.'

# 'दोन शब्द'

कथा, कादंबऱ्याच्या मार्गावरून चालताना मी या बालकांच्या मार्गाकडे कसा वळलो याचे मला नवलच वाटते... पण जे घडते ते चांगल्यासाठीच घडते.

माझीही खूप दिवसापासूनची इच्छा होती की; चिमुकल्या बालकांच्या ज्ञानात भर टाकण्यासाठी माझाही हातभार लागावा.... मला लहानपणी जेवढे ज्ञान मिळायला हवे होते तेवढे मिळाले नाही याची मला खंत वाटते; परंतु जे मला मिळाले नाही ते कमीत-कमी इतर बालकांस तरी मिळावे, एवढीच तळमळ मनामध्ये सलत राहिली म्हणूनच मी बालकांसाठी लेखणी उचलली.....

आणि मला हे शेवटपर्यंत करायचे आहे; नव्हे तर हे माझे कर्तव्यच आहे असे मी समजतो.


'ज्ञानसूर्य' हा बालकथासंग्रह लिहिताना मी स्वत: तर मेहनत घेतलीच पण इतरांचेही सहकार्य लाभले. सुधाकर प्रभू, सूर्यकांत तावडे यांच्या प्रेरणेनेच मी लिहू शकलो. माझे सहकारी शिक्षक, शिक्षिका व श्री. मारकड सर, यांनी वेळोवेळी मदतीचा हात दिला... यांचाही मी ऋणी आहे.

सोनाली प्रकाशनचे आभार मानावे तितके थोडेच आहे. माझे पहिलेच पुस्तक प्रकाशित करण्याचे त्यांचे धाडस स्तुत्य आहे. मुखपृष्ठ व आतील सुबक चित्रे पुस्तकांची अधिकच शोभा वाढवतात, आणि हे करण्याचे सर्व श्रेय - 'रजनी फणसळकर' यानांच आहे. या सर्वांचाच मी अत्यंत ऋणी आहे.

- रुपाग्रज

# "पाच पैशाची किंमत"

सोनू पाचवीच्या वर्गात शिकणारी एक चुणचुणीत मुलगी होती. तिचे पप्पा मोठ्या ऑफिसमध्ये नोकरी करीत होते. त्यांना पगारही भरपूर असायचा त्यामुळे सोनूला दररोज खाऊसाठी थोडेफार पैसे मिळायचे.



मग काय, सोनूची दररोज मज्जाच मज्जा! गोळ्या काय, चॉकलेट काय, पेप्सी काय, अशा अनेक गोड



2002

पदार्थाची चव तिच्या जिभेवरती खेळत असे.

तिला जेवढे खाऊसाठी पैसे मिळायचे ते सर्व ती खाऊसाठी खर्च करायची; ह्याचे तिला काहीच वाटत नव्हते. उलट ती मैत्रीणींना म्हणायची; ''खाऊचे पैसे खाऊसाठीच खर्च करावे,

पप्पा मोठ्या प्रेमाने खाऊला पैसे देतात आणि आपण खाऊ खायचा नाही म्हणजे तो पप्पांचा अपमानच नाही का?''

पण एकदा काय झाली गंमत;

ती गंमत कसली; सोनूची फजितीच म्हणाना! शाळेजवळील एका दुकानात नवीनच चॉकलेट आले. त्याची चव तोंडात खूप वेळ राहते हे सोनूने ऐकले होते. मग काय; चक्क् डझनभर चॉकलेट तिने घेतली. तिने स्वत: तर खाल्लीच पण आपल्या लहान भावासही घेतली. या उत्साहाच्या भरात तिने किती पैसे खर्च केले हे तिलाच माहीत नव्हते. पण तिच्या आवडीचे चॉकलेट मिळाले म्हणून ती खूष होती.

शेवटच्या तीन तासानंतर शाळा सुटली. सोनू रमत-गमत बसस्टॉपला आली. काही वेळातच बस आली अन् ती सावकाश बसमध्ये चढली. रिकामा बाक पाहून ती त्यावर पटकन बसली. सोनूच्या जवळच एक आजी उभ्या होत्या. त्या खूप थकलेल्या दिसत होत्या. सोनूला आजींची दया आली. सोनू उठून उभी राहिली आणि तिने आजींना बसण्यास जागा दिली. सरांनी सांगितलेले

शब्द सोनूला पटकन आठवले.

"वृध्दांना मदत करावी
मोठ्यांची सेवा करावी"

याप्रमाणे चिमुकल्या सोनूने आपले कर्तव्य चोख बजावले होते.

बस वेगाने धावत होती. झाडे उलट दिशेने पळत होती. सर्व वाहनांची तीच अवस्था होती. या गंमती सोनू खिडकितून पहात असतानाच सोनूजवळ कंडक्टर आला. कंडक्टरला पाहून सोनूला मम्मीने सांगितलेले कोडे आठवले ;

"पुजारी नसून घंटी वाजवतो, भिकारी नसून पैसे मागतो, वेडा नसून कागद फाडतो ; असा कोण? सोनूच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले होते. "कंडक्टर"

पण आता पुढे सोनूची फजितीच झाली' कंडक्टरने सोनूला तिकिटाचे पैसे मागितले. सोनूनेही खिशातील पैसे दिले, पण तिच्याकडे बसच्या तिकिटापुरते पैसे शिल्लकच राहीले नव्हते. होते फक्त पंचान्नव पैसे... तिकिट मात्र एक रुपया... पाच पैसे कमी पडले. पैसे कमी म्हणून कंडक्टर तिकिट देईना. सोनू गोंधळून गेली. ती कंडक्टरला सांगू लागली ;

"अंकल-अंकल मला क्षमा करा, माझ्या हातून चूक झाली. बसचे पैसे मी खाऊसाठी वापरले. मी उद्या देईन ना पैसे, प्लीज द्या ना तिकिट!" तसा कंडक्टर खेकसला,

"बसने प्रवास करणे म्हणजे शेजारच्या दुकानातून

माल आणणे नव्हे... दुकानदार एकच असतो म्हणून तो उधार राहतो... इथे तसे नाही. 'पैसे दे नाहीतर खाली उतर!''

यावर सोनूतरी काय बोलणार, चूक तिचीच होती ना! बिचारीचे डोळे पाण्याने डबडबले. तिने कंडक्टरला खूप विनवले पण काही उपयोग झाला नाही. शेवटी तिला बसमधून खाली उतरावे लागले.



ती रस्त्यावरून एकटीच चालू लागली.अंधार वाढत होता....सोनू घाबरत होती,तरीही ती चालत होती.तिचे पाय सुजले होते,रडून-रडून डोळे थकले होते.घरी

पोहचणेही गरजेचे होते....नाहीतर बाबांचा मार.

भीतभीत कशीतरी सोनू साडेसातला घरी पोहचली. तिचे पप्पा, मम्मी तिला शोधत होते....सहा वाजता येणाऱ्या सोनूचा अजून पत्ता नव्हता म्हणून मम्मी रडत होती....मम्मीला दारात पाहताच सोनूला रडू कोसळले, ती आईला बिलगली...तरीही ती थडथड उडत होती.झाला प्रकार सोनूने मम्मीला सांगितला. मम्मी तिचे केस कुरवाळत म्हणाली;

''बाळा...सोनू. खर्च करताना अगोदरच नेहमी खिशाचा सल्ला घ्यावा. बसचे पैसे अगोदरच वेगळे काढून ठेवावे. एकएक पैशालाही किमंत असते''

सोनूला आईचे म्हणने पटले होते. आईने सांगितल्याप्रमाणे ती वागणार होती कारण तिला पाच पैशाने चांगलीच अदद्ल घडविली होती. म्हणूनच मम्मीचे बोलणे तिला लवकर पटले.

सोनू आता दररोज बसचे पैसे प्रथमच बाजुला काढत होती. उलट खाउच्या पैशातून पाच-पाच पैसे शिल्लक ठेवत होती. हाच तिचा क्रम चालला होता...

आठवडयाचे सात दिवस गेले,महिन्याचे तीस दिवस गेले, वर्षाचे बारा महिने गेले...तरीही सोनूने आपला क्रम चालूच ठेवला...

आणि अचानक सोनूची मम्मी आजारी पडली, तिला ताप भरला होता,डोकही दु:खत होते..अशातच सोनूचे पप्पा बाहेरगावी गेले होते.

सोनू मम्मीला म्हणाली ;

"मम्मी दवाखान्यात का जात नाही; मी बोलवू का डॉक्टरांना?" यावर मम्मी बोलायची;

"सोनू, तुझे पप्पा घरी नाहीत;तिजोरीच्या चाव्या त्यांच्याकडे आहेत.ते आले की जाईन दवाखान्यात –

जा,जेवण कर आणि अभ्यासाला बस!"



मम्मीकडे पैसे नव्हते हे सोनूने ओळखले. लगेच तिने तिची बॅग खाली ओतली,आणि वर्षभर जमविलेले पाच पैशाची 'तीनशे पासष्ट' नाणी मिळाली.म्हणजेच अठरा रूपये पंचवीस पैसे झाले... सोनू पटकन शेजारच्या डॉक्टरांकडे गेली; ती त्यांना घरी घेवून आली.मम्मीला

त्यांनी इंजेक्शन व औषध दिले...आपल्या पैशातूनच सोनीने डॉक्टरची फी दिली.

काही वेळाने मम्मीचा ताप उतरला;डोकेही शांत झाले...तिने सोनूला जवळ घेतले; तिच्या गालाचा 'पापा' घेतला आणि म्हणाली;



''सोनू, तू इतकी हुशार, बुध्दीमान असशील असे मला स्वप्नातही वाटले नव्हते...बचतीचे मुल्य जे आम्हाला समजत नाही ते तूला समजले..तूझे पाच- पाच पैसेच मला अंथरूणावरून उठवू शकले..

''सोनी खऱ्या अर्थाने तुला पाच पैशाची किंमत

समजली!''सोनूने मान हलवून उत्तर दिले;

''खरच, मम्मी, पाच पैशालाही खूप किंमत असते!''

लेमन गोळी, दातांची होळी

शाळेची मधली सुट्टी झाली होती. जेवणाचे डबे संपवून हासहुश करत मुले शाळेच्या खाऊच्या स्टॉलकडे धावत होती.

दररोज दोन-दोन रूपयाच्या गोळया खाणारा 'बंटीही' त्यामध्ये न चुकता आला होता...बंटी तसा श्रीमंत बापाचा मुलगा, मग पैशाला काय कमी ? बंटी दुसऱ्यालाही गोळ्या खाण्यासाठी पैसे देत असे.म्हणूनच तो सर्वांचा आवडता होता. हो! तसा तो वर्गात हुशारही तितकाच.

आजही तो लेमन गोळ्या खरेदी करत होता. आपल्या मित्रांना वाटत होता. अचानक त्याचे लक्ष जवळच उभ्या असलेल्या पिंकीकडे गेले.तो लगेच तिच्या जवळ गेला व म्हणाला,

''काय पिंकी,आज काय पप्पानी पैसे नाहीत दिले.?

लेमन बघ, काय गोळ्या आल्यात स्टॉलमध्ये! चल मी देतो पैसे.''

पिंकी मोठमोठाले डोळे करून म्हणाली,

''माझेही पप्पा श्रीमंत आहेत बर का! मलाही खाऊला पैसे मिळतात, तेही तूझ्यापेक्षा जास्त, पण मी तुझ्या सारख्या लेमन गोळ्या नाही खात .पैसे साठवून मी गोडगोड, स्वचछ फळे विकत घेते. फळांमध्ये 'जीवनसत्व' असतात; त्याने शरीर निरोगी राहते. लेमन

गोळ्यांनी दात खराब होतात!''

यावर बंटी खो-खो हसला आणि म्हणाला.

''हट् वेडी कुठली!, म्हणे लेमनने दात खराब होतात. तूला पैसे मिळत नाहीत म्हणून तू लेमन घेत नाहीस. मला शहाणपणा शिकवू नकोस!'' असे म्हणून बंटीने पाच-सहा गोळ्या एकदम तोंडात टाकल्या आणि वर्गात धूम पळत सुटला.

पिंकीही वर्गात गेली. थोड्या वेळांनी गुरुजी वर्गात आले. तास सुरु झाला. प्रश्नोत्तर सुरु झाले.



आता बंटीची फजिती झाली गुरुजींनी नेमका

बंटीलाच प्रश्न विचारला. पण बंटीला काही बोलता येईना! अहो, तो बोलणारच कसा, तोंडात तोंडभरून गोळ्या होत्या ना!

एवढा हुशार बंटी पण आज उत्तर का देत नाही यामुळे सर्वांचेच लक्ष त्याच्याकडे गेले..... बंटी मात्र तोंडास हात लावून उभा होता. पण गुरूजींनी जेव्हा हातात छडी घेतली तेंव्हा बंटीला तोंड उघडणे भाग पडले.

आणि वर्गात हशा झाला

बंटीने तोंड उघडले आणि तोंडातील गोळ्या खाली पडल्या. बंटीच्या या कृत्याची गुरुजींना चिड आली आणि त्यांनी बंटीला चांगले झोडपले.

बंटीला लेमन गोळीमुळे वर्गात पहिल्यांदाच मार खावा लागला होता. पिंकी बंटीच्या रडवेल्या चेहऱ्याकडे पाहून गालातल्या गालात हसत होती, बंटी तिच्याकडे मोठाले डोळे करून पहात होता. त्यालाही वाटायचे 'आपण पिंकीचे ऐकले असते तर अशी वर्गात फजिती झाली नसती.'

कालचा मार बंटी कालच विसरला होता. तो दुसऱ्याही दिवशी गोळ्या खाऊ लागला. पिंकी त्याला दररोज सांगत होती पण तिचे बंटी मुळीच ऐकत नव्हता. तो नित्य नियमाने गोळ्या खाऊ लागला.

काही दिवस, काही महिने बंटीचा हा क्रम चालूच होता. पण त्याचे फळ त्याला आता मिळू लागले होते. त्याचे दात आता दुःखत होते. त्याला जेवताना त्रास

होऊ लागला. त्याच्या दातांना किड लागली होती. उंदराने कुरतडल्या सारखे त्याचे दात झाले होते. वर्गातील मुले त्याला चिडवायची,

''बंटी..... घे लेमन तुकडे–
तुझे दात उंदराकडे''

बंटीला फार राग यायचा.... पण बिचारा करणार काय! त्याच्याच हातून चूक झाली होती... बंटी मुले चिडवतात म्हणून सर्वांपासून लांब बसायचा, तो खेळतही नसे; त्याला कुणी खेळायलाही घेत नसे. कारण लेमन



गोळ्या जास्त खाल्ल्यामुळे त्याच्या तोंडातील 'लाळेचे'

2002 21/2/07
बा.वा.

प्रमाण जरूरीपेक्षा खूपच वाढले होते. तो बोलताना लाळ ओठापर्यंत यायची; मुलांना याची किळस वाटायची. त्याच्या किडलेल्या दातांमुळे त्याच्या तोंडाचा घाण वास येत असे. म्हणूनच मुले त्याला आपल्यापासून दूर लोटायची.

एके दिवशी शाळेच्या 'शोकेस' मध्ये सूचना लागली;

''सुदंर व स्वचछ दातांची स्पर्धा''

''भाग घ्या आणि बक्षीस मिळवा!''

बंटीने आत्तापर्यंत शाळेचे एकही बक्षीस सोडले व्हते. एकही स्पर्धा त्याने सोडली नव्हती. प्रत्येक स्पर्धेत




त्याचा सहभाग असायचा. पण या स्पर्धेत तो भाग घेवू

शकत नव्हता. त्याचे दात पांढरेशुभ्र तर नव्हतेच प
किडलेलेहि होते.

त्याला त्याची चूक समजली होती. तो धावत
डॉक्टर अंकलकडे गेला आणि म्हणाला.

"डॉक्टर अंकल, डॉक्टर अंकल, माझे दात ब
करा ना! मला 'सुंदर दात स्पर्धेत भाग घ्यायचा आहे
प्लिज डॉक्टर अंकल."

डॉक्टर बंटीला समजावत म्हणाले;

"अरे, एखाद्या आजारी माणसाला औषध दिल्यानंतर तो ताबडतोब बरा होत नाही. काही दिवसांची विश्रांती त्याला हवीच असते. पण तो बरा मात्र नक्की होतो."

बंटी मध्येच म्हणाला;

"डॉक्टर, मग माझेही दात बरे होतील ना?

अगदी पहिल्या सारखे पांढरे शुभ्र!"

डॉक्टर हसतच बोलले;

"अरे, एवढा घाबरु नकोस, तूझेही दात नक्की बरे होतील... पण त्याच्यासाठी एक गोष्ट करावी लागेल."

बंटीने मान हलवून उत्तर दिले; "ती, कोणती?"

"डॉक्टर म्हणाले; "यापुढे जर तू लेमन गोळ्या खाणे बंद केले तर तूझे दात अगदी पूर्वीसारखेच होतील."

"लेमन गोळी म्हणजेच दातांची होळी' हे कधीही विसरु नकोस!"

बंटीला डॉक्टरचे सांगणे पटले होते.... म्हणून तो शाळेत आपल्या मित्रांना सांगत सुटला होता.

''लेमन गोळी खाऊ नका; दातांचा बळी देऊ नका.'' त्यांचे सांगणेही मित्रांना पटले होते म्हणूनच सर्वजण आता मिळून म्हणत होती; ''लेमन गोळी खाऊ नका, दाताला बळी देऊ नका''

''लेमन गोळी, दातांची होळी'
लेमन गोळी, दातांची होळी''



# शिळ्या भाकरीला; पोळीची चव!

गणू तसा हुशार व बुद्धीमान मुलगा होता.

पण घरची परिस्थिती चांगली नव्हती. वडील केव्हाच ईश्वराघरी गेले होते. वडीलांचे प्रेम त्याला मिळालेच नव्हते. दुसरे भाऊ-बहीण त्याला कोणीच नव्हते. गणू आणि त्याची आई एका छोट्याश्या झोपडीत रहात असे.

गणूची आई मिळेल ते काम करायची, धुणी भांडी करायची. लोकांनी दिलेल्या शिळ्यापाक्यावरती दोघे दिवस काढायचे. गणूही मिळेल ती छोटी मोठी कामे करायचा. शाळेच्या वेळेपर्यंत करता येईल तेवढे काम करायचा. तेवढेच चार-आठाणे त्याला मिळायचे. मग तेच साठवून एखाददुसरी वही, जुने पुस्तक तो खरेदी करायचा. फाटक्या पुस्तकांवर आणि फुटक्या पाटीवर त्याचा अभ्यास चालायचा. त्याला खूप वाईटही वाटायचे पण त्याची आई त्याला सारखी सांगायची,

''गणू, देवाने जे दिले त्यातच समाधान मानावे-

शिळी भाकरी आनंदाने खाल्ली की, तिलाही पोळीची चव येते!''

म्हणूनच गणू आहे त्या परिस्थितीला सांभाळून न्यायचा. त्याला शाळेत खूप त्रास व्हायचा. तो एकाच वहीमध्ये सर्व विषयाचा अभ्यास करायचा त्यामुळे गुरुजी त्याला मारायचे. गणूला वाटायचे, आपले दु:ख आपण

इतरांना कशाला सांगावे म्हणून तो गुरूजींना आपली परिस्थिती सांगत नव्हता. मार बसेल त्या दिवशी गणू शाळेच्या एका कोपऱ्यात बसून रडायचा. आणि आपले दु:ख कमी करायचा.

अशातच गणूची सहामाही परीक्षा जवळ आली. परिक्षा फी पाच रूपये गणूला भरणे गरजेचे होते. पण पाच पैसे न कमावणाऱ्या गणूने पाच रूपये कुठून आणायचे. आईपण कुठून देणार पैसे! गणूने खूप प्रयत्न केला पण काही उपयोग झाला नाही. त्याची फी नसल्यामुळे सहामाही परीक्षा बुडाली. गणू आईच्या गळ्यात पडून ओक्साबोक्सी रडला.....

गणूने आता ठरवले होते कि, सहा महीने काम करायचे आणि फी भरून वार्षिक परिक्षेलाच बसायचे. त्याचा बेत पक्का झाला. आईनेही त्याला आधार दिला.



लागला. दूध विकले की घरोघरी पेपर देऊ लागला. दिवसभर बसटॉप वर चणे-फुटाणे विकत असे. हा त्याचा दररोजचा क्रम होता. यात कधीही खंड पडला नाही. आईही पहिल्यापेक्षा जास्त काम करू लागली.

गणू दररोज इतका राबायचा पण त्याला चांगलेचुंगले खायला कधी मिळाले तर नाहीच पण जे मिळाले तेही पोटभर मिळाले नाही. मिळेल तशी भाजी, मिळेल तशी भाकरी तो आनंदाने खात होता म्हणूनच तो समाधानी होता. गणूने कधी आपल्या आईजवळ कशासाठी हट्ट धरला नाही.

आई शिवाय या जगात त्याला त्याच्या जवळचे कुणीच नव्हते. म्हणूनच तो आईला दु:ख देत नव्हता... उलट आईला तो म्हणायचा,

''आई तू माझ्यासाठी किती कष्ट घेतेस ?

एवढे मोठे उपकाराचे ओझे माझ्यावरती नको टाकू. त्याची उतराई होताना मला खूप त्रास होईल''

आई त्याला जवळ घेवून म्हणायची,


''अरे, मुलांसाठी झटणे हे आईचे कर्तव्यच असते. तिला ते पार पाडलेच पाहिजे.''

दोघेही मिळून काम करू लागली. पैसे हळूहळू जमू लागले आणि दोन महिन्यातच गणूने पुस्तकांचे व फिचे पैसे जमविले..

फी भरून तो पुन्हा शाळेत जाऊ लागला. मन लावून अभ्यास करू लागला. गुरुजींनाही त्याची परिस्थिती आता मुलांकडून समजली होती. वह्यामध्ये गणूला सूट

मिळाली होती. वरच्या वर्गातील मुलांच्या जुन्या वह्या जमवून मिळतील ती कोरी पाने तो काढू लागला... सुईने शिवून त्याने त्याच्या छानश्या वह्या तयार केल्या. त्यावर तो मोत्यासारखे अक्षर लिहू लागला. त्याला गुरूजींची शाबासकी मिळू लागली.


त्याचे जेवणाचे हाल मात्र चालूच होते. रात्री एकावेळेसच त्याचे जेवण असायचे. शाळेत येताना त्याला जेवण नसायचे: जेवणाची सुट्टी झाली की तो मुलांची जेवणे होईपर्यंत लांब जावून बसायचा. मुले 'भिकारड्या' म्हणून चिडवू लागली तेव्हा तो नुसतेच फडके



बांधून आणायचा. मुलांना वाटायचे त्याने डबा आणला. पण तो डबा नसून रिकामे फडकेच असायचे.

चार शहाणी मुलं भाकरीचे चारचार घास जमा करून त्याला द्यायची. गणू त्यातच आपली भूक शांत करायचा.

गणूची कपड्याचीही तशीच अवस्था होती. पण गणू फाटकेच कपडे शिवून व्यवस्थित घालून यायचा. आपली गरीबी त्यांने कधीच दाखवण्याचा प्रयत्न केला नाही. जे आहे त्यातच तो समाधानी राहिला. गणू फुटक्या पाटीवरती आणि फाटक्या पुस्तकावरती शिकला.



भरपूर अभ्यास केला. रात्ररात्र त्याने रस्त्यावरच्या दिव्याखाली बसून अभ्यास केला. परीक्षा संपल्या. सर्व पेपर गणूने व्यवस्थित सोडवले.

काही दिवसातच निकाल लागला आणि गणू राज्यात प्रथम आला. बक्षिसांचा ढीग त्याच्या समोर लागला. त्याला स्कॉलरशिप मिळाली.

'त्याचा शिक्षणाचा प्रश्न सुटला.

आणि खाण्याचाही!'

आईच्या उपकाराची गणूने परतफेड केली होती. आईची इच्छा पूर्ण झाली होती. तिचे सांगणे गणूने वारंवार ऐकले होते. म्हणूनच आज त्याने यशाचे शिखर गाठले होते.

गणूने आईच्या पायाला स्पर्श करून म्हटले ''खरच आई;

''शिळ्या भाकरीलाही,

पोळीची चव आणता येते''

# आम्हीच वैरी 'वृक्षांचे'

रविवार म्हटला की, मुलांची अगदी मज्जाच! हवं तितका आणि हवा तो खेळ मनसोक्त खेळता येतो. कुणी लंगडी तर कुणी कबड्डी, कुणी लगोर तर कुणी क्रिकेट. खेळ जुनेच असले तरी मुलं मोठ्या आवडीने खेळतात. पण याही पेक्षा चांगला व बुद्धीमान खेळ खेळणारी मुले असतात, बर का!



अगदी याप्रमाणेच 'आदर्श नगर' मध्ये राहणारी मुले. सगळ्यांशी मिळून मिसळून वागणारी असाच रविवारचा दिवस होता. घरातील सर्व कामे व अभ्यास संपवून मुले वडाच्या झाडाखाली जमली. आता कोणता खेळ खेळायचा हा सर्वांसमोर प्रश्न होता.

एवढ्यात किरणचे लक्ष समोरच झाडाच्या फांद्या तोडणाऱ्या पांडुकडे गेले. किरणला हे कृत्य पाहून दुःख वाटले. झाडावरती उगारलेली कुऱ्हाड आपल्यालाच लागतेय असा त्याला भास झाला. आणि यातच तो किंचाळला:



"मला, तोडू नका, मला तोडू नका!"

किरणच्या या कृत्याने सर्वजण घाबरून गेली. राजूने पटकन पाणी आणले. किरणच्या चेहऱ्यावरती पाणी शिंपडले. थोडया वेळाने किरण शुद्धीवर आला. तोपर्यंत पांडुचे झाड तोडून झाले होते. किरणच्या हे जेव्हा लक्षात आले तेव्हा त्याचे डोळे पाण्याने डबडबले. तुटून पडलेल्या झाडाकडे पाहून, घरातील कुणी भाऊबंध गेल्यासारखे वाटले. राजूने त्याला विचारले.

"किरण, आज तूला काय झाले आहे?

आज आपण काय खेळायचे?"

किरण डोळे पुसतच म्हणाला

"आज आपण मुलांचे न्यायालय भरवायचे" तसा राजू आश्चर्याने म्हणाला;

"मुलांचे न्यायालय! म्हणजे कोर्टासारखे! आणि ते कशासाठी? इथे कुणी चोरी केलीय? कुणी कुणास मारलेय? मी काही समजलो नाही."

राजूच्या या सर्व प्रश्नांने किरणला हसूच आले. तो राजूला खेळ समजावू लागला...

"राजू... नीट ऐक! आज आपणास या झाडाखाली कोर्टाप्रमाणेच मुलांचे न्यायालय करायचे आहे... आपल्यापैकीच न्यायाधीश, वकील, आरोपी, शिपायी सर्वांनी बनायचे आहे."

जवळच उभ्या असलेल्या बबलूने विचारले.

"पण आपण कोणत्या विषयावर खटला चालवायचा? कसे प्रश्न असणार?" यावर किरण म्हणाला;

''आम्हीच वैरी वृक्षांचे' हा आपला विषय. वृक्ष तोडणाऱ्या मुलाच्या बाजूने एक वकील बोलेल व वृक्ष न तोडणे या बाजूने सरकारी म्हणजे आमचा वकील बोलेल.''

सर्वांना विषय आवडला होता. किरणने हा चांगला खेळ काढला म्हणून मुलांनी त्याला न्यायाधीश बनविले. पांडू आरोपी म्हणजे लाकडे तोडणारा मुलागा झाला. दोन मुलांनी काठ्या पकडून पिंजरा बनवला. त्यामध्ये पांडू उभा राहिला. झाडाच्या ओटयावर किरण न्यायाधीश म्हणून




बसला... चारपाच जुन्या वह्या त्याच्याजवळ ठेवल्या.

राजूने व बबलूने पावसाळ्यात घालायचा रेनकोट घातला. ते वकील झाले होते ना!

अशा तऱ्हेने मुलांचे न्यायालय तयार झाले. बाकीची मुलं, मुली खाली बसल्या आणि खेळांस प्रारंभ झाला. सर्व मुले उत्सुक झाली कान टवकारले गेले. किरणने दगडावर दगड आपटून कामकाज सुरु केले.

न्यायाधीश: आरोपी नं. एक–केसाप्पा कंगवाप्पा भांगपांडे.

शिपाई: गैरहजर

न्यायाधीश: आरोपी नं. दोन–सुतुळे पुतुळे बारदाने.

शिपाई: गैरहजर

न्यायाधीश: आरोपी नं. तीन–टायररिंग टुपसिंग पंक्चर

शिपाई: गैरहजर

न्यायाधीश: आरोपी नं. चार–पांडू

पांडू आरोपी: हजर साहेब.

न्यायाधीश: सरकारी वकील, याचा काय गुन्हा आहे?

सरकारी वकील: न्यायाधीश साहेब; या पांडूने एक हिरवेगार झाड तोडले आहे. झाड तोडणे हा गुन्हा आहे. त्याला आपण शिक्षा फर्मावी.

न्यायाधीश: पांडू! तूझा गुन्हा तूला कबूल आहे?

आरोपी पांडू: न्यायाधीश साहेब, मला गुन्हा कबूल आहे. पण झाड का तोडले याची माझ्या वकीलांमार्फत चौकशी व्हावी.''

न्यायाधीश: तुमच्या वकीलांस परवानगी आहे. ते सांगू शकतात.

वकील: न्यायाधीश साहेब! पांडूने झाड तोडले हे खरे

आहे पण, त्याने झाड मजा म्हणून तोडलेले नाही. वाळक्या लाकडांच्या मोळ्या विकून तो आपल्या कुटुंबाला संभाळतो... हे लक्षात घेवून, न्यायाधीश साहेबांनी पांडूला निर्दोष सोडावे अशी मी आरोपीच्या वतीने विनंती करतो.

सरकारी वकील: न्यायाधीश साहेब, आत्ताच आरोपीच्या वकीलाने सांगितले की पांडू वाळल्या लाकडांच्याच मोळ्या विकतो. मग त्याने ओल्या फांद्या का तोडल्या? जरूरीपेक्षा त्याने जास्त लाकडे तोडली त्यामुळे त्याला शिक्षा झालीच पाहिजे!''

वकील : झाडे रात्री कार्बनडाय ऑक्साईड सोडतात, तो मानवास हानिकारक आहे. म्हणून पांडूने पूर्ण झाड तोडले असेल!

सरकारी वकील: न्यायाधीश साहेब! झाडे रात्री कार्बनडाय ऑक्साईड सोडत असली तरी ती मनुष्यास उपयुक्त असणारा ऑक्सिजन दिवसभर पुरवतात. झाडे पाऊस आणतात, छाया देतात, जमीनीची धूप थांबवतात, फळे देतात, फुले देतात. म्हणूनच झाडे तोडणे हा गुन्हा आहे तो पांडूच्या हातून झाला आहे. त्याला सजा झालीच पाहिजे.''

या बरोबर सर्व मुले उठून एकदम म्हणतात,

''पांडुला सजा झालीच पाहिजे

पांडुला सजा झालीच पाहिजे''

न्यायाधीश : दगडावर दगड आपटतो आणि सर्वांना शांत बसवून पुढील कार्यास सुरवात करतो. सर्वजण शांत बसतात. न्यायाधीश काय शिक्षा देतात याकडे

सर्वांचे लक्ष खिळून राहते.

न्यायाधीश: ''आरोपीची व सरकारी वकीलाची बाजू लक्षात घेवून आरोपी पांडूला दोषी ठरवत आहे. त्याने हिरवे झाड तोडले या गुन्ह्याबद्दल त्याला दहा झाडे लावण्याची व ती जोपासण्याची सजा देत आहे.''

सर्व मुले टाळ्यांच्या गजरात न्यायाधीशांचे स्वागत करतात.



मुलांचे न्यायालय संपते. त्यांचा ह्या नवीन खेळास पूर्णविराम मिळतो.

सर्व जण एकत्र येवून निश्चय करतात.  
''आपणच वृक्षांचे वैरी बनायचे नाही,  
हिरवा वृक्ष तोडायचा नाही,  
शिक्षेला पात्र व्हायचे नाही''


२९०२ ९८/२/०७  
वा. वा.

# गरीब बिचाऱ्या चिमणीला !

प्रत्येक मुलाला काही तरी छंद नक्कीच असतो. पण काही दोस्तांचे छंद औरच असतात.

रस्त्यावरून चूपचाप जाणाऱ्या कुत्र्याला दगड मारणे, आपल्या घरट्यात निवांतपणे बसलेल्या चिमणीस दगड



मारणे. असेही काही जणांचे खेळ असतात. 'मुलांची होते मजा; पण त्यांना मात्र सजा'

पप्पूही यापैकीच एक. तोही विनाकारण पक्षांना, प्राण्यांना दगड मारायचा. ते ओरडायला लागले की तो टाळ्या पिटायचा.

असेच एके दिवशी पप्पू शाळेतून घरी येत होता. पावसाच्या लहान लहान सरी येत होत्या. यातच एक कुत्री आपल्या पिल्लांना सुरक्षित जागी नेऊन ठेवत होती. पप्पूला मजाच वाटली. त्याने पटकन दगड उचलला आणि कुत्रीला मारला. त्या दगडाने कुत्रीचा पाय मोडला. ती बिचारी तिथेच विव्हळत पडली. तिची पिल्ले पावसात धडपडत होती. त्यांना आणण्याचा कुत्री प्रयत्न करीत होती. पण व्यर्थ. पण पप्पू मात्र मजा करीत घरी निघून गेला.

घडलेला प्रकार त्याने आपल्या आईला सांगितला. आईने पप्पूच्या गालात प्रथम खाड्कन वाजवली. पण आईचे हृदय मेणासारखे. लगेच वितळते. तिने पप्पूला जवळ घेतले आणि म्हणाली;

''बेटा, पप्पू, प्राण्यांवर आणि पक्षांवर दया करावी, त्यांच्या आणि आपल्या दु:खात फारसा फरक नाही. कारण गुन्हा नसताना तूला जर कोणी मारले तर तू गप्प राहशील का? प्राणी व पक्षी दयाळू असतात म्हणूनच ते गप्प बसतात.

आईचे बोलणे पप्पूला पटले होते. त्याप्रमाणे वागायचे त्याने ठरविले होते.

पप्पूच्या घरासमोरच एक जांभळाचे झाड होते.

खरं तर त्या झाडाला जांभळे नव्हतीच, पण चिमण्यांची घरटी मात्र भरपूर होती. कारण पप्पूच्या घराजवळच शेती होती. बरीचशी मुले जांभळे पाडण्याच्या निमित्ताने चिमण्यास दगड मारायला यायची. हा त्यांचा नित्य क्रम ठरलेला असायचा.

अशाच एके दिवशी एका मुलाकडून चिमणीला दगड लागला गेला. गरीब बिचाऱ्या चिमणीचा एक पंख व एक पाय निकामी झाला. चिमणी खाली पडताच तिच्याभोवती मुलांचा घोळका झाला. काही मुले तिला दगड मारू लागली, तर काहींनी तिच्या पायाला दोरा बांधला. काहींनी वरती उचलून खाली पाडले.

बिचारी चिमणी काय करणार? ती घाबरली होती. तिच्या पंखातून व पायांतून रक्त वाहत होते.. आपण आता मरणार अशी तिची खात्री झाली... थरथरत्या शरीराने ती तशीच बसून राहिली. मुलं छळतच राहिली.

एवढ्यात पप्पू धावतच घोळक्यात आला. पहातो तर समोर चिमणी पडलेली. त्याला त्या चिमणीची दया आली. आईचे शब्द आठवायला त्याला त्यावेळेस उशीर लागला नाही. पप्पूने सर्वमुलांना बाजूला सारले व तो चिमणी जवळ गेला. तिला थोडसे पाणी पाजले. तिला दोन्ही हातांनी अलगद उचलले आणि छातीशी घट्ट पकडले.

चिमणीला थोडासा आधार वाटला. तिची भिती कमी झाली. तिची थडथडही कमी झाली. पप्पूने चिमणीला आधार दिला.

आपल्या मुलाच्या कृत्याबद्दल आईलाही आनंद वाटला. तिच्यापरीने तिने पप्पूला मदतही केली.



पप्पूने चिमणीची जखम स्वच्छ केली. पाय व्यवस्थित बांधला. तिला त्याने दररोज शेक दिला. तिला दररोज चारा पाणी घालू लागला. चिमणीची तब्येत हळुहळु चांगली होवू लागली. तिला थोडीशी तरतरी आली. ती हळुहळु चालूही लागली.

पप्पू चिमणीला आता मोकळे सोडत होता. तरीही ती उडून जात नव्हती. तिलाही पप्पूचा लळा लागला होता. पप्पू शाळेतून घरी आला की चिमणी चिवचिव

करावचा. पंख फडफडून त्याचे स्वागत करायची, पप्पू मुलांप्रमाणेच तिच्याशी बोलायचा;

''चिमुताई, तू कशी आहेस आज?

बरी आहेस ना? लवकर बरी हो आणि तुझ्या पिलांकडे तू परत जा। ती तुझी वाट पहात असतील ना?''

पप्पू स्वत:च्या जेवणाअगोदर चिमणीला चारा द्यायचा.दोघांची आता चांगलीच गटट्टी जमली होती. चिमणी रात्री देखील पप्पूच्या बिछान्यात झोपायची. पप्पूलाही तिच्याशिवाय करमत नव्हते.

चिमणी एकटीच चूपचाप बसली की, पप्पूला वाटायचे तिला तिच्या पिलांची आठवण झाली. पप्पू म्हणायचा;

''चिऊताई, ये चिऊताई, तू रडतेस?
तूला तूझ्या पिलांची आठवण येते का?
सोडेन हं लवकर तुला. तू चांगली बरी झाला का मी पोहचवेन हो तुला!''

चिमणी काय बोलणार! पंखात चोंच घालून ती बसायची!

काही दिवसातच चिमुताईची तब्येत सुधारली. तिचा पाय बरा झाला, पंखही चांगले झाले. ती छानपैकी उडू शकत होती...

पप्पू आज तिला सोडणार होता. त्याने चिमणीला अंगणात आणले. आलेले अश्रु पुसून त्याने चिमणीला उंच उडविले. चिमणीही पिलांच्या आतुरतेने उंच उडाली....

पप्पूची आई त्याला जवळ घेत म्हणाली.



''गरिब बिचाऱ्या चिमणीला;
प्रेमळ पप्पूने आधार दिला''
'आणि हाच धडा आज आपण गिरवू चला'

# होता अप्पू, म्हणून वाचला पप्पू

अप्पू व पप्पू तसे जवळचेच मित्र, खेळणार दोघे, जेवणार दोघे, शाळेत जाणार दोघे... एकमेकांना सोडून दोघे कधीच रहात नव्हते.

अप्पू थोडा हुशार व बुद्धीमान होता. पप्पू इतका हुशार नव्हता पण तो जिद्दी होता. एखादी गोष्ट त्याच्या मनात आली की तो करणार म्हणजे करणारच. मग ती कितीही कठिण असो. पुढे काय होईल याची त्याला मुळीच पर्वा नसायची. अप्पू त्याला वेळोवेळी सांगायचा:

''अरे पप्पू, आपल्या आटोक्यातलच काम करावे. कोणतेही काम करण्याचे धाडस विचार करूनच करावे.'' यावर पप्पू बोलायचा,

''अरे मित्रा कुठला. तू ही एखादे धाडसाचे काम करत नाहीस, आणि मी करतो तर मला तू अडवतोस''

असे बोलून पप्पू अप्पूला गप्प करायचा. पप्पूच्या या धाडसी व जिददी स्वभावामुळे त्याला खूप वेळेस मारही खावा लागत असे. पण याचा परिणाम त्याच्यावरती काहीच होत नसे. त्याचा स्वभाव कधीच बदलत नव्हता. सर्वजण बोलून त्याला थकले होते.

एखादा मुलगा जर त्याला म्हणाला, ''पप्पू तू 'उंदराला' भितोस!''... पप्पू लगेच चार-पाच उंदरे पकडून आणायचा आणि त्या मुलास दाखवायचा. कुणी म्हटले तू 'झुरळांना' भितोस? तेव्हा पप्पू लगेच दहा-बारा

झुरळे डबीत घालूनच आणायचा. तू भितोस, तुला हे काम येत नाही असे पप्पूस कोणी म्हटलेले आवडायचे नाही.

पण एकदा पप्पूची चांगलीच फजिति झाली. त्याची फळे त्याला खूप दिवस भोगावी लागली.

रोजच्या प्रमाणे मुले नदीच्या काठावर गप्पा मारत बसली होती. त्यामध्ये अप्पूची व पप्पूचीही हजेरी लागली...

नदीचे पाणी वेगाने वाहत होते. काही मुले पाणी कसे वाहते याकडे पाहत होती तर काही पाण्यात खडे टाकून मजा करत होती. एका मुलाने पप्पूला विचारले;

''पप्पू, तूला पोहता येते का रे?''

पप्पू म्हणाला ''नाही''

एवढ्यात दुसरा मुलगा म्हणाला;

''मग पप्पू पाण्याला भितोस?''

पप्पूला हे त्याचे बोलणे आवडले नाही. तो उठून उभा राहिला. आणि अंगावरचे कपडे उतरवत म्हणाला,

''मी पाण्याला मुळीच भित नाही. हे बघ आत्ता जातो नदीच्या पलीकडील काठावर! असे म्हणून तो पुढे धावला'' एवढ्यात अप्पूने त्याचा हात पकडला व म्हटले.

''पप्पू, वेडा तर नाही तू? तूला पोहता येत नाही आणि तू नदीचा किनारा कसा गाठशील? माघारी फिर''

पण पप्पू अप्पूचे थोडेच ऐकणार होता. त्याने

नदीच्या पात्रात पटकन उडी घेतली. मग काय उडी टाकल्या बरोबर तो गटांगळ्या खावू लागला. पाण्यात बुडू लागला. त्याच्या नाकातोंडामध्ये पाणी जाऊ लागले. तो जोरजोराने ओरडू लागला.

"वाचवा, वाचवा, मेलो! मेलो!! पप्पू बुडतोय हे पाहून इतर सर्व मुले घराकडे धूम पळत सुटली. अप्पू तिथेच होता.



अप्पूने कपडंयांसहीतच नदीच्या पाण्यात उडी घेतली. त्याने पप्पूला एका हाताने पकडले. आणि पोहतपोहत अप्पूने पप्पूला काठावर आणले.

पप्पू बेहोश झाला होता.अप्पूने ताबडतोब पप्पूला पालथे झोपविले.त्याच्या पाटीवरती थोडा दाब देऊन निघेल तेवढे पाणी काढण्याचा प्रयत्न केला. काही वेळाने पप्पू शुध्दीवर आला. अप्पूने त्याला दोन्ही हातांवरती उचलून घेतले आणि त्याला घरी नेले. झाला प्रकार अप्पूने त्याच्या आईवडींलास सांगितला. त्याचे आईवडीलही घाबरून गेले. त्यांनी ताबडतोब पप्पूस दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी पप्पूला पूर्ण तपासले व म्हणाले ;

''पप्पूच्या शरीरातील पाणी निघाले नाही. ते ऑपरेशन करूनच काढावे लागेल.''पप्पूचे आई वडील चिंतेत पडले, कारण ऑपरेशन करायचे म्हटले तर चारपाच हजार रूपये तरी लागतील.काय करावे हेच त्यांना समजेना.त्यांच्या जवळ तर फक्त तीनच हजार, एक हजार कुठून आणायचे? ऑपरेशन तर केलेच पाहिजे.

एवढयात अप्पू पुढे आला, तो म्हणाला..

''पप्पूच्या आई, तुम्ही काही काळजी करू नका.मी हजार रूपये जमवून देईन. पप्पू नक्की बरा होईल.''

पप्पूचे ऑपरेशन झाले.त्याच्या आई–वडीलांनी होते तेवढे तीन हजार दिले. आणखी एक हजार रूपये दिल्या शिवाय डॉक्टर पप्पूला घरी सोडणार नव्हते.

अप्पू ही पैशाची जमवाजमव करू लागला.अनेक शाळांमधून त्याने गाण्याचे व नकलांचे कार्यक्रम केले. पप्पूची स्थिती त्याने मुलांसमोर मांडली. मुलांनीही त्याच्या

कार्यक्रमावर खूष होऊन व पप्पू बरा होण्यासाठी आनंदाने पैशाची मदत केली. अशाप्रकारे अप्पूने आठ दिवसातच एक हजार रूपये जमविले.

डॉक्टरचे पैसे दिल्यानंतर पप्पूला घरी आणले. पप्पूला अप्पूने केलेली मदत माहीत झाली होती. अप्पू घरी येताच पप्पूने त्याला मिठ्ठी मारली आणि म्हणाला–



"अप्पू, तुझ्यामुळेच मी वाचू शकलो. मला माझी चूक कळ्ली. यापुढे तूझ्या सल्लया शिवाय कोणतेही धाडसाचे काम करणार नाही."

एवढयात पप्पूचे आई–वडील त्यांच्या जवळ आले.त्या

दोघांनी त्यांना जवळ घेतले व म्हणाले;
''होता अप्पू, म्हणुन वाचला पप्पू''

# क्षणाचा आळस, अपयशाचा कळस

आळशी मुलांची प्रत्येक गोष्ट अगदी औरच.अभ्यासात आळस,कामात आळस, सर्वात आळस...हां...खाण्यात मात्र नक्कीच नाही.

अगदी याप्रमाणेच 'दगडू' हा आळशी मुलगा होता. त्याचे अगदी उलट होते.तो म्हणायचा,



"आजचे काम उदया,उदयाचे काम परवा आणि

परवाचे काम चक्क आठदिवसांनी'' या तत्वानेच त्याची प्रत्येक काम चाललेले असे. पण तीही वेळेवर कधी पूर्ण झाली नाहीत.

आंघोळ झाल्यानंतर डोके पुसण्याचा आळस, कपडे घालताना बटणे लावण्याचा आळस, दप्तर नीट ठेवण्याचा आळस. पण या सर्व गोष्टी त्यांच्या अंगवळणी पडल्या होत्या म्हणूनच त्याला काहीच वाटत नव्हते.

एकदा झाली गंमत.

इंग्रजीच्या सरांनी वर्गातच शब्दाचे स्पेलिंग पाठ करण्यास सांगितले, आणि एका शब्दाचे स्पेलिंग चुकले की पाच वेताच्या छडया. पण दगडू मात्र आपल्या तत्वावर गेला.

'आजचे काम उदया'-म्हणून तो वर्गात शांत बसून राहिला.-थोडया वेळांनी गुरूजींनी शब्दांचे स्पेलिंग विचारण्यास सुरवात केली.पण दगडूला एकाही शब्दाचे स्पेलिंग सांगता आले नाही. मग काय? खाल्ला पोटभरून मार

यावर सर दगडूला म्हणाल;

''दगडू, तू शब्दाचे स्पेलिंग का पाठ केले नाही?''

दगडू म्हणाला;

''सर,मी आजचे काम नेहमी उदया करतो. मी माझ्या तत्वाचे काटेकोरपणे पालन करतो. यावर सर बोलले;

''ठिक आहे, मग उदया शब्दाचे स्पेलिंग पाठ करून ये''

दगडूने फक्त मान हलविली. सरांच्या माराने त्याचे डोळे पाण्याने डबडबले होते. हातही सुजले होते.त्याच्या आळसाचे फळ त्याला मिळत होते.

शाळा सुटल्यानंतर तो घरी गेला. जातानाच त्याने पक्का निश्चय केला की, इंग्रजीचे स्पेलिंग पाठ करायचे,सरांचा उद्या मार खायचा नाही.

रात्री दगडू भरपूर जेवला. अभ्यासासाठी त्याने वही काढली. पण जांभया सारख्या येऊ लागल्या... डोळे आपोआप झाकू लागले, आणि एवढ्यातच त्याचे तत्व त्याच्या लक्षात आले.

'उद्याचे काम परवा'

मग काय! त्याने पटकन वही बंद केली आणि गाढ झोपी गेला. शब्द पाठ केलेच नाहीत.

ठरल्याप्रमाणे तो दुसऱ्या दिवशी शाळेत गेला. गुरूजींनी शब्द विचारले, दगडूला एकाही शब्दाचे स्पेलिंग आले नाही. आणखी मार खाल्ला.

परत सरांनी त्याला विचारले ;

''दगडू शब्द का पाठ केले नाहीत ?''

यावर दगडू म्हणाला ;

''सर, मी उद्याचे काम परवा करतो ?''

सर बोलले.

''दगडू, तुला एक दिवस वाढवून देतो, तू परवा शब्द पाठ करून ये.''

दगडूने फक्त मान हलविली.

शाळा सुटल्यानंतर तो घरी गेला. पहिल्यासारखाच

त्याने जाताना निश्चय केला.

पण संध्याकाळी भरपूर जेवण करून तो जेव्हा अभ्यासाला बसला तेव्हा पटकन त्याचे तत्व त्याला आठवले.

'परवाचे काम आठ दिवसांनी'

मग काय! गेला गाढ झोपी. शब्द पाठ केलेच नाहीत. परत शाळेत सरांचा मार. परत सरांचा तोच प्रश्न,

"दगडू, शब्दाचे स्पेलिंग का पाठ केले नाहीस?"
दगडूच्या तत्वाचे ठरलेले उत्तर;

"सर, मी परवाचे काम आठ दिवसांनी करतो."
सरांनी परत दगडूला आठ दिवसांची मुदत दिली.
आठ दिवसांनी परत दगडू शाळेत आला. सरांनी परत त्याला शब्दांचे स्पेलिंग विचारले. पण दगडूला एकाही शब्दाचे स्पेलिंग आले नाही. सरांनी विचाले;

"दगडू, आठ दिवसाच्या मुदतीतही तुझे शब्द पाठ झाले नाहीत?"
यावर दगडू बोलला.

"सर, आठ दिवसानंतरचा अभ्यास केंव्हा करायचा याचा निश्चित दिवस माझ्या तत्वात नाही."

यावर सर तरी काय बोलणार! सरांनी दगडूचा शाळेचा दाखला काढून दिला. त्याचे नाव शाळेतून कमी झाले. दगडूला त्याच्या आळशीपणाचे चांगलेच फळ मिळाले.

दगडू नंतर आपल्या आई-वडीलांस शाळेत घेवून

आला. त्यांच्या विनंतीवरून सरांनी दगडूला परत शाळेत घेतले...

पण परत एकदा गंमत झाली. सहामाही परीक्षा सुरू झाली होती. आज पहिलाच पेपर. पेपर लिहित असताना दगडूचा पेन बंद पडला. समोर त्याचे दप्तर होते. त्यात पेन होते. पण त्याला वाटायचे. बेंच वरून




कधी उठावे? पेन कधी घ्यावा? या विचारातच पेपरचा वेळ संपून गेला. दगडूने पेपर कोराच दिला. आणि मग तो नापास झाला. सरांनी सर्व मुलांसमोर त्याला बेदम मारले...

पण दगडूला आता चांगलाच पश्चाताप झाला होता. त्याला त्याची चूक समजली होती. त्याची तत्वे त्याने पूर्ण बदलून तो अभ्यासाला लागला आणि वार्षिक परीक्षेत चांगल्या गुणांनी पास झाला.


आता तोच दगडू आळशी मुलांना सांगत सुटला,

''क्षणाचा आळस, अपयशाचा कळस''

क्षणाचा आळस, अपयशाचा कळस''




५२
BVBK-0402902



बालवयात मिळणारे सुख व ज्ञान मिळावे तेवढे मिळाले नाही याची खंत 'रूपाग्रजांच्या मनात सदैव सलत राहिली; परंतु ज्या पासून आपण वंचित राहिलो ते कमीत कमी इतर चिमुकल्या पाडसांना देण्यासाठीच त्यांनी हातात लेखनी घेतली. आणि त्यांनी 'ज्ञानसूर्य' हा बालकथासंग्रह लिहीला.

या कथासंग्रहात त्यांनी, पर्यावरण, विज्ञान, साहस, बचत इत्यादी महत्वाच्या बाबी हाताळल्या आहेत. हे वाचून कोणताही बालक अष्टपैलू बनेल यात शंकाच नाही.

यासाठी रूपाग्रजांनी खूप मेहनतही घेतली आहे. त्यांचे वाचन, मनन, चिंतन हेच त्यांच्या यशाचे आधार स्तंभ होय. यात रूपाग्रज निश्चीतच यशस्वी होतील यात शंकाच नाही!

प्रा. प्र.द. पुराणिक